गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS


वर्ष २ रे ● अंक ९७ वा ● शनिवार २४ ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 97 | Date : 24/08/2024 | blow Saturday | Page 4 Price 4


## युक्रेन-रशिया चर्चा आवश्यक! युद्धावर उपायासाठी पंतप्रधान मोदींचा दोन्ही देशांना सल्ला

**दैनिक यशसिद्धी न्युज**

कीव्हः रशिया आणि युक्रेनदरम्यान गेल्या अडीच वर्षांपेक्षा जास्त काळ सुरू असलेल्या युद्धावर अंतिम उपाय शोधण्यासाठी दोन्ही देशांनी एकमेकांशी चर्चा करणे आवश्यक असल्याची भारताची भूमिका आहे असे



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांना सांगितले. पंतप्रधान मोदी शुक्रवारी युक्रेनच्या दौऱ्यावर पोहोचल्यानंतर दोन्ही नेत्यांदरम्यान द्विपक्षीय संबंध तसेच युक्रेन युद्धावर विस्तृत चर्चा झाली.

परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी या चर्चेविषयी माहिती देताना सांगितले की, चर्चेतील बराचसा भाग द्विपक्षीय संबंधांबद्दल होता. तसेच, रशिया-युक्रेन युद्धाबद्दलही महत्त्वपूर्ण चर्चा झाली. मोदी यांच्या पहिल्याच युक्रेन दौऱ्याचे वर्णन भारताकडून 'ऐतिहासिक भेट' असे करण्यात आले आहे. व्यापक प्रमाणात स्वीकार्यता, युद्धग्रस्त प्रदेशात शांतता व स्थैर्य यासाठी योगदान यासाठी कल्पक उपाय विकसित करण्यात सर्व संबंधितांनी सहभाग घेण्याची गरज आहे असे मोदींनी चर्चेदरम्यान स्पष्ट केले. युक्रेनमध्ये शांतता लवकर नांदण्यासाठी भारत योगदान तयार करण्यास तयार असल्याचाही त्यांनी पुनरुच्चार केला.

दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या तपशीलवार, खुल्या आणि रचनात्मक चर्चेदरम्यान पंतप्रधान मोदींनी या युद्धाच्या परिणामाबद्दल 'ग्लोबल साउथ'मध्ये व्यापक प्रमाणात चिंता व्यक्त केली जात असल्याचे झेलेन्स्की यांच्या कानावर घातली. तसेच, मॉस्कोमध्ये रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याबरोबर झालेल्या चर्चेबद्दल माहिती दिली. प्रत्यक्ष युद्धाची परिस्थिती आणि राजनैतिक चित्र यांच्याबद्दल झेलेन्स्की यांचे काय मूल्यमापन आहे याबद्दल मोदींनी विचारणा केली.

। पान २ वर

# मविआला धक्का; २४ ऑगस्टचा बंद बेकायदेशीर

## मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय!

**दैनिक यशसिद्धी न्युज**

मुंबई : राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांचा निषेध नोंदवण्यासाठी महाविकास आघाडीने उद्या २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. मात्र, अशाप्रकारे बंद घोषीत करणे बेकायदा असून कोणत्याही पक्षाला बंद पुकारण्याचा अधिकार नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. उच्च न्यायालयाचा हा



निर्देश महाविकास आघाडीसाठी मोठा धक्का आहे. यावरून आता पुन्हा एकदा राज्यातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.महाविकास आघाडीच्या या बंद विरोधात आज वकील गुणरत्न सदावर्ते यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज तातडीची सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने अशाप्रकारे बंद घोषीत करता येणार नाही, असे स्पष्ट केले. तसेच बंद घोषीत करणे बेकायदा असून जर उद्या कुणी अशाप्रकारे बंद पुकारतील त्यांच्यावर कारवाई करा, असे निर्देशही न्यायालयाने दिले.

न्यायालयाच्या या निर्णयानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही प्रतिक्रिया दिली. उच्च न्यायालयाने महाविकास आघाडीचा बंद बेकायदा ठरवल्याची बातमी आताच समजली. खरं तर यापूर्वीदेखील न्यायालयाने बंदबाबत अशाप्रकारे निर्णय घेतले होते. तसेच दंडही ठोठावला होता. मात्र, तरीही विरोधकांनी बंद घोषीत केला. अशा बंद मुळे सर्व सामान्य

। पान २ वर

## 'उद्याचा महाराष्ट्र बंद मागे घ्या', शरद पवारांचं आवाहन




बदलापूर घटनेच्या पार्श्र्वभूमीवर उद्या दि.२४ ऑगस्ट २०२४ रोजी राज्यव्यापी सार्वजनिक बंदचे आवाहन करण्यात आले होते. त्या दोन अजाण बालिकांवर झालेला अत्याचार हा अतिशय घृणास्पद होता. परिणामी समाजातील सर्व स्तरांतून याबाबतीत तीव्र लोकभावना उमटल्या. या बाबीकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा हा प्रयत्न होता. हा बंद भारतीय राज्यघटनेच्या मुलभूत अधिकारांच्या कक्षेत होता. तथापि मुंबई उच्च न्यायालयाने सदर बंद घटनाबाह्य असल्याचा निर्वाळा दिला आहे. सदर निर्णयाविरूद्ध सर्वोच्च न्यायालयात तातडीने दाद मागणे वेळेच्या मर्यादेमुळे शक्य नाही. भारतीय न्यायव्यवस्था संविधानात्मक संस्था असल्याने संविधानाचा आदर राखून उद्याचा बंद मागे घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे, असं शरद पवार यांनी एक्सवर (ट्विटर) म्हटलं आहे.

## नेपाळ बस दुर्घटनेत जळगावमधील २४ जणांचा मृत्यू

**दैनिक यशसिद्धी न्युज**

नेपाळ : नेपाळ दर्शनासाठी गेलेल्या पर्यटकांची बस नदीत कोसळल्याने २४ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर १६ पर्यटक गंभीर जखमी झाले आहेत. या मृतांमध्ये काहीजण



जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यातील वरणगाव परिसरातील असल्याची माहिती समोर आली. शुक्रवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास हा अपघात नस्र्यांगडी अंबुखैरनीजवळ घडला. भाविक पोखराहून काठमांडूला जात असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस नदीत कोसळल्याची घटना घडली.

नेपाळमध्ये झालेल्या या बस दुर्घटनेत जळगाव जिल्ह्यातील २४ जणांच्या मृत्यूप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शोक व्यक्त करीत कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त केली आहे. तसेच या घटनेतील मृतदेह तातडीने महाराष्ट्रात आणण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच केंद्रीय वरीष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधला आहे. याप्रकरणी केंद्राकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्र्वासन केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी मुख्यमंत्र्यांना दिले. मुख्यमंत्र्यांच्या विनंतीला तात्काळ प्रतिसाद देत वायुसेनेच्या विमानाने उद्या (२४ ऑगस्ट) २४ जणांचे मृतदेह नाशिकमध्ये आणण्यात येणार आहेत. तेथून कुटुंबियांकडे ते पोहोचविण्यात येणार आहेत.जळगाव जिल्ह्यातील भाविकांच्या बसला नेपाळमध्ये दुर्घटना झाल्याने

। पान २ वर

## विद्यार्थिनींच्या सुरक्षा उपाययोजनांच्या सक्षमीकरणासाठी समिती : शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांची माहिती

**दैनिक यशसिद्धी न्युज**

मुंबई : विद्यार्थिनींसोबत घडणाऱ्या दुर्देवी घटना रोखण्यासाठी शासन विविध उपाययोजना करीत आहे. याचाच एक भाग म्हणून शालेय शिक्षण आणि महिला व बालविकास



विभागाच्या एकत्रित प्रयत्नांतून या उपाययोजनांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. यासाठी महिला व बालविकास आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येत असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.

शालेय शिक्षण मंत्री श्री.केसरकर यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे, शालेय शिक्षण प्रधान सचिव आय.ए.कुंदन, एकात्मिक बाल विकास प्रकल्प आयुक्त कैलास पगारे

। पान २ वर

## इस्त्रोच्या चांद्रयान-३ मोहिमेचा प्रवास अंतराळ संशोधक व भारतीयांसाठी प्रेरणादायी : कुलगुरू डॉ प्रकाश महानवर

- ✼ पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन सोलापूर विज्ञान केंद्रात उत्साहात
- ✼ विद्यार्थ्यांचे अंतराळ संशोधनावर नाविन्यपूर्ण प्रकल्पाचे सादरीकरण
- ✼ सेल्फी विथ चांद्रयान-३ मोहिमेचा विज्ञानप्रेमींनी घेतला आनंद
- ✼ चंद्राला स्पर्श म्हणजे तंत्रज्ञानाचा विकास

**दैनिक यशसिद्धी न्युज**

सोलापूर/प्रतिनिधीः भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोचा प्रवास हा बैलगाडी, सायकल पासून सुरू झाला आणि २३ ऑगस्ट २०२३ रोजी भारताने चंद्रयान-३ तीन मोहीम यशस्वीरित्या पूर्ण केली. विक्रम लँडर चंद्रावर सॉफ्ट लँडिंग केले आणि प्रज्ञान रोव्हरने पृथ्वीवर छायाचित्र पाठवले, हा प्रवास अतिशय थक्क करणारा आणि अंतराळ संशोधक व भारतीयांसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ प्रकाश महानवर यांनी केले.






पहिल्या राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित केंद्रीय संचार ब्युरो, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि सोलापूर विज्ञान केंद्र यांच्या सयुंक्त विद्यमाने सोलापूर विज्ञान केंद्रातील बहुउदेशीय सभागृहामध्ये आयोजित मल्टीमीडिया प्रदर्शनाच्या उद्धाटन प्रसंगी कुलगुरू महानवर बोलत होते. यावेळी क्षेत्रीय प्रचार अधिकारी

। पान २ वर

## डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी तातडीने पावले उचला ; सर्वोच्च न्यायालयाचे केंद्र, राज्य सरकारांना निर्देश

**दैनिक यशसिद्धी न्युज**

नवी दिल्ली : कोलकात्याच्या आर. जी. कर वैद्याकीय महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास लावलेला विलंब ही 'अतिशय चिंताजनक' बाब आहे, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी खडसावले. तसेच डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देशही केंद्र आणि सर्व राज्य सरकारांना न्यायालयाने दिले.

कोलकात्यातील बलात्कार-हत्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वत:हून दखल घेत याचिका दाखल केली आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठासमोर गुरुवारी झालेल्या सुनावणीमध्ये न्यायालयाने आपला कठोर पवित्रा कायम ठेवला. मागच्या सुनावणीवेळी स्थापन करण्यात आलेले 'राष्ट्रीय कृती दल' सर्व संबंधितांकडून सूचना मागवीत असून आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी राष्ट्रीय नियमावली तयार करेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. गुरुवारच्या सुनावणीत न्यायालयाने कोलकाता पोलिसांवर पुन्हा एकदा ताशेरे ओढले. ''आर. जी. कर वैद्याकीय महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी कुणी संपर्क केला होता का? गुन्हा दाखल करण्यास १४ तासांचा विलंब का झाला? इतका विलंब होण्याचे कारण काय?''

। पान २ वर

## उत्पादन शुल्क विभागाचा दणका; एक कार व दोन दुचाकी वाहनास सुमारे १९ लाखाचा मध्यमाल जप्त



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः राज्य उत्पादन शुल्क विभागाचे धाडस सत्र सुरूच राज्य उत्पादन शुल्क सोलापूर कडून दिनांक २१ ऑगस्ट २०२४ दिनांक २३ ऑगस्ट २०२४ या कालावधीत विभागीय उपायुक्त राज्य उत्पादन शुल्क पुणे विभाग सागर ढोमकर अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क जिल्हा सोलापूर भाग्यश्री जाधव उपाधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सोलापूर मुख्यालय एस आर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यश्री जाधव अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क जिल्हा सोलापूर यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आज राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत अवैध हातभट्टी दारू निर्मिती या अवैध दारू वाहतूक याबाबत राबविण्यात आलेल्या मोहिमेस मुळगाव तांडा वडजी तांडा तालुका दक्षिण सोलापूर पंढरपूर तालुका माळशिरस तालुका जिल्हा सोलापूर या ठिकाणी टाकण्यात आलेल्या दाढीमध्ये हातभट्टी दारू निर्मिती बाबत एकूण वीस गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत

या गुणांमध्ये २८ ,४०० लिटर रसायन जप्त करून नशा करण्यात आली तर पंधरा पंधरा लिटर हातभट्टी दारू जप्त करून नाश करण्यात आलेली आहे या ठिकाणी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यामध्ये ०४ जणांच्या विरुद्ध गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क ए. बी विभाग भरारी पथक पंढरपूर विभाग माळशिरस विभाग यांनी अवैद्य हातभट्टी निर्मिती अवैद्य दारू विक्री केंद्राविरुद्ध राबवलेल्या मोहिमेमध्ये एकूण २० गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत त्यामध्ये वीस हजार चारशे लिटर रसायन व १५ १५ लिटर हातभट्टी दारू जप्त करून नाश करण्यात आलेली आहे यास देशी विदेशी या बियर जप्त करण्यात आलेले आहेत तसेच त्यांनी नोंद केलेल्या गुन्ह्यामध्ये एक चार चाकी वाहनाचा व दोन दुचाकी यादेखील समावेश आहे या धाडसतरामध्ये एकूण रुपये १८७५०४०/ इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे ही कारवाई जगन्नाथ पाटील निरीक्षक श्री अविनाश घाडगे श्रीरामचंद्र चौरे निरीक्षक श्री पंकज कुंभार निरीक्षक पंढरपूर सुखदेव सिद्ध समाधान शेळके धनाजी पवार दत्तात्रय लाडके मानसी वाघ श्रद्धा गडदे श्री डी बी पाटील दुय्यम निरीक्षक जीवन मुंडे अलीम शेख होळकर सहाय्यक दुय्यम निरीक्षक जवान सर्वश्री पांढरे दोघी गोडेकर इंगोले माळी करचे वेळापुरे बेगमपुरी खंदारे शहीद शेख दीपक वाघमारे संजय नवले विजयकुमार शेळके प्रकाश सावंत विकास वडमिली यांनी केली राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सोलापूर यांच्याकडून आव्हान करण्यात येते की अवैद्य मध्यविक्रीती निर्मिती वाहतूक साठवणूक तसेच गोवा राज्य निर्मिती मध्य बनावट मध्याची विक्री वाहतूक अथवा साठ्याबाबत माहिती असल्यास त्याबाबतची तक्रार या विभागाच्या टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ हा व्हाट्सअप क्रमांक ८२२२००११३३ यावर करण्यात यावी माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल

# संपादकीय

## समाजाच्या हिताचे नाही..

अनेक कुटुंबे न्यायालयाची पायरी चढतात. २०२१ ते २०२३ या तीन वर्षांत राज्यात दरवर्षी सुमारे ३८ हजार खटले दाखल झाले. केंद्रीय विधी व न्याय खात्याने ही आकडेवारी माध्यमात जाहीर केली आहे. हा चिंतेचा विषय आहे. अनेक कुटुंबे मिळून समाज तयार होतो. परिणामी समस्येची कारणे शोधून त्यावर उपाय योजणे ही जाणत्यांची आणि ते उपाय अमलात आणणे ही लोकांची जबाबदारी आहे. याबाबतीत जाणत्यांचे निरीक्षण काय सांगते? नव्या पिढीत संयम कमी होत आहे. स्वातंत्र्य आणि समानतेचा चुकीचा अर्थ लावला जातो असे मत नागपूर कुटुंब न्यायालयातील ज्येष्ठ वकील रेखा बारहाते व्यक्त करतात. परस्पर सामंजस्य आणि सन्मान जपला तर वाद कमी होतील, असेही त्या म्हणाल्या. या उणिवा दूर करण्याची निकड सर्वांना सारखीच जाणवण्याची गरज आहे. याचाच परिणाम समाजस्वास्थ्यावर देखील होतो. समाजात बालगुन्हेगारी वाढत आहे. अडनिड्या वयाच्या मुलांचा सामाजिक गुन्ह्यात सहभाग आढळतो. पाचवीतील मुलाने दप्तरात पिस्तूल आणले आणि मित्राला गोळी घालून ठार केल्याची घटना नुकतीच बिहारमध्ये घडली. उद्ध्वस्त होत चाललेली कुटुंबव्यवस्था हे या समस्यांचे मूळ आहे. ज्याचे भयंकर परिणाम समाज अनुभवत आहे. काळानुसार जगण्याच्या पध्दतीत बदल अपरिहार्य आहेत. संयुक्त कुटुंबपध्दती छोटी होणे हे त्याचे चपखल उदहारण. त्याचे औचित्य पटवणारी कारणेही सांगितली जाऊ शकतात. तथापि त्याचा अर्थ मूल्ये बदलणे असा होऊ शकेल का? संयुक्त कुटुंबात भावभावनांचा निचरा घरातच होऊ शकायचा. अशी घरे सर्वांसाठी मूल्यांची शाळा होते. मोठी माणसे संयम, सहनशीलता, प्रसंगी मौन पाळणे याचा पुरस्कार करायची. तर छोट्यांवर संस्कार आणि मूल्ये रुजवली जायची. मुलांचे ऐकून घेणारे हक्काचे कान घरातच होते. प्रेम, माया, आपुलकी, जिव्हाळा या भावनिक गरजांची पूर्तता आपोआपच व्हायची. चित्र फक्त छानच नसायचे. वाद, ताणतणाव आणि भांडणेही होती. तथापि ती संपवण्याचा विवेक काही जणांकडे तरी असायचा. तथापि कुटुंबे छोटी होताना या सगळ्या गोष्टींना पर्यायी व्यवस्था उभी करण्याच्या जबाबदाऱ्यांचा मात्र विसर पडला असावा का? त्याची जाणीव समाजाला सातत्याने करून देण्याची जबाबदारी जाणत्यांची आहे. कारण स्वस्थ कुटुंबातूनच उत्तम मुले म्हणजेच उत्तम माणूस घडतो. कोणत्याही कारणांवरून ती प्रक्रिया थांबणे समाजाच्या हिताचे नाही हेच आकडेवारी दर्शवते.



# महिला आणि मुलीवर बलात्कार आणि खून करणाऱ्यांना तातडीने शिक्षा करा

## महाराष्ट्र लोकविकास मंचकडून उमरगा तहसीलदाराना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

उमरगा/प्रतिनिधी : महाराष्ट्र लोकविकास मंचच्या वतीने उमरगा तहसीलदार येरमे यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र लोक विकास मंचाचे राष्ट्रीय सचिव भूमिपुत्र वाघ, विजया वाघ, रोहिणी गायकवाड,तसलीम फकीर वैष्णवी राठोड, फातिमा मुर्शिद,लक्ष्मी गायकवाड, शितल जाधव,नंदिनी जाधव,शेख सिमरन, बागवान सिमरन,शेख अफसाना, तेवर संजना, बिराजदार स्वाती आणि युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्र मध्ये झालेल्या खून आणि बलात्कारामध्ये अटक झालेल्या लोकांना जलद गती न्यायालय मार्फत केस चालवून त्यांना योग्य सजा व्हावी.अशी मागणी करण्यात आली आहे.या मागणीसाठी परिसरातील युवा कार्यकर्त्यांनी आपले म्हणणे मांडले.

# मा,आ. काळे यांच्या जन्मदिनानिमित्त न्यू इंग्लिश स्कूल देर्डे-चांदवड येथे गरजु विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्याचे वाटप




**दैनिक यश सिद्धी न्यूज**

निफाड/प्रतिनिधी :कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन माजी आमदार अशोकराव काळे यांचे ७१ व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त कोपरगाव तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल देर्डे- चांदवड शाळेत दिनांक २२ ऑगस्ट २०२४ रोजी गोरगरीब विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्याचे वाटप शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले असून अवांतर खर्चाला फाटा देऊन गरजू विद्यार्थ्यांची गरज पूर्ण केल्याने या स्तुत्य उपक्रमांचे नागरिकांनी कौतुक केले असून शाळेचे आभार मानले आहे, याप्रसंगी शाळेचे शिक्षक संजय खैरनार, रमेश हिंगे ,पंढरीनाथ शिंदे ,सदाशिव कदम, कानिफनाथ कहांडळ, श्रीमती जयश्री फटांगरे, मोहिनी जेडगुले, व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# कु.अक्षरा गुरवचे आगळेवेगळे रक्षाबंधन सीमेवर तैनात असलेल्या सैनिक टाकळी जवानांसाठी व त्यांच्या गावी असणाऱ्या मुलांना शाळेत पाठविल्या राख्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सैनिक टाकळी/संजय चव्हाण : शिरोळ तालुका. सैनिक टाकळी लहान लहान मुलांचे वय हे खरंतर खेळण्या व बांगड्याचे असते. पण आता मोबाईल व कॉम्प्युटरमुळे मुलांमधील कल्पनाशक्ती कमी होत चालली आहे असे दिसते. मात्र समाजात आजही काही मुलं आपल्या कल्पनाशक्तीचा परिपूर्ण उपयोग करतात.







त्यांच्यातील एक म्हणजे कुमारी अक्षरा गुरव राहणार साळस्ते तालुका कणकवली जिल्हा .सिंधुदुर्ग. गेल्या तीन-चार वर्षापासून अक्षरा गुरव नावाची मुलगी आपल्या कल्पकतेच्या बळावर असाच एक वेगळा उपक्रम राबवत आहे. कोरोना काळापासून ती दरवर्षी स्वतःच्या हाताने राख्या तयार करून सीमेवर लढणाऱ्या भारतीय सैनिकांना पाठवत आहे. असेच एक दिवशी अक्षरा गुरव हिचे राखी चे पत्र सैनिक परंपरा असलेल्या सैनिक टाकळी चे जवान हवालदार संजय निकम सेना भवन दिल्ली येथे कार्यरत असताना त्यांच्या हाती पडले .आणि तेथूनच अक्षरा गुरव आणि सैनिक टाकळीच्या जवानांची ऋणानुबंध वाढण्यास सुरुवात झाली. सैनिक टाकळी येथील बऱ्याच जवानांच्या बरोबर अक्षराचे नियमित संभाषण होत असते. यावर्षी सुद्धा अक्षराकडून या गावाचे जवान जेथे जेथे कार्यरत आहेत. तिथे राख्या पाठवण्याचा प्रयत्न केला आहे. देशाच्या संरक्षणासाठी प्रतिकूल परिस्थितीत घरदार विसरून प्राण्याची बाजी लावणाऱ्या त्या अनाम जवानांसाठी कोणीतरी आठवण प्रेमाने राखी पाठवले असते प्रेमाचे चार शब्द लिहिले असतात ते बघून एरवी आपल्या माय भूमी कडे वाकड्या नजरेने बघणाऱ्या शत्रूंचा कर्दन काळ आसलेला रांगड्या गडी हळवा भाऊक होतो. नवी उर्मी घेऊन आनंदाने नाचतो व गातो. जवानाबद्दल आपला आदर प्रेम व्यक्त करण्यासाठी सर्वसामान्य जनता ही अतुर असते पण आपली भावना कशी व्यक्त करावी त्यांना माहीत नसते. पण राखीचे प्रेम भाग्याने भाऊबंदन जुळण्याची संधी दिली आहे हे बंधन जुळण्यासाठी जवानांनी सर्वसामान्य नागरिक यांच्यातील आहे. ती कोकणातील अक्षरा गुरव. यावर्षी तिने त्या जवानांची मुले शिकत असलेल्या शाळेमध्ये त्यांच्या मुलांना राख्या बांधण्यासाठी आपण स्वतः तयार करून शंभर राख्या सैनिक टाकळी गावातील माजी सैनिक बी.डी .पाटील यांच्या नावावरती पाठवून खरोखरच देश सेवेसाठी तत्पर असलेल्या सैनिक व त्यांच्या परिवारावर किती जिव्हाळा आहे हे दाखवून दिले आहे. अक्षरा गुरव हिने पाठवलेल्या राख्या सैनिकांची मुले असलेल्या कुमार व कन्या विद्या मंदिर सैनिक टाकळी येथे देऊन तेथे रक्षाबंधनाचा अनोखा सोहळा पार पडला यावेळी दोन्ही शाळेच्या मुख्याध्यापिकाने अक्षरा गुरव व त्याच्या या उपक्रमाचे तोंड भरून कौतुक केले. व आपल्या विद्यार्थ्यांना तिचा आदर्श घ्यावा असे सांगितले. या रक्षाबंधनाच्या सोहळ्यास दोन्ही शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग व मुले मुली व माजी सैनिक बी.डी .पाटील. सुहास जाधव. दीपक पाटील. हजर होते. त्यावेळी माजी सैनिकांनी अक्षरा गुरव तुला आम्हासैनिक टाकळीकर कडून व जवानांकडून तुला सलाम तू सतत असाच उपक्रम राबवत जा आणि आम्हा सैनिकांचे मनोधैर्य वाढवत जा जेणेकरून आम्ही सर्वजण भारत मातेच्या सेवेसाठी तत्पर राहील असे मनोगत व्यक्त केले.

पान १ वरुन

## मविआला धक्का; २४ ऑगस्टचा

माणूस भरडला जातो. त्यामुळे न्यायालयाने जो निर्णय दिला आहे, त्याची अंमलबजावणी राज्य सरकार करेन, असे ते म्हणाले.

बदलापूर तसेच राज्यातील इतर ठिकाणी झालेल्या महिलांवरील अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. महाविकास आघाडीचे नेते उद्धव ठाकरे, शरद पवार आणि नाना पटोले यांनी राज्यातील जनतेला महाराष्ट्र बंदमध्ये सहभागी होण्याचं आवाहन केलं होतं. उद्याचा बंद हा विकृती विरुद्ध संस्कृती, असा असून हा बंद राजकारणासाठी नाही, अशी भूमिका उद्धव ठाकरे यांनी मांडली होती. तसेच या बंद दरम्यान राज्यात अत्यावश्यक सेवा सुरू राहतील, असेही त्यांनी सांगितले होतं.

## युक्रेन-रशिया चर्चा आवश्यक!

त्यावर, झेलेन्स्की यांनी त्याबद्दल माहिती दिली. तसेच, जागतिक शांतता शिखर परिषदेत भारताने सतत सहभागी असावे अशी युक्रेनची इच्छा असल्याचेही त्यांनी सांगितले.

दुसरी जागतिक शांतता शिखर परिषद भारतात आयोजित करण्यासाठी उत्सुक असल्याचे युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की, मी भारताला भेट देण्याची योजना आखत आहे. भागीदारी, सामरिक भागीदारी सुरू झाल्यावर आणि संवाद सुरू झाल्यावर फार वेळ दवडून चालणार नाही, असे ते म्हणाले. पंतप्रधान मोदी यांची पुन्हा भेट घ्यायला आवडेल असे सांगतानाच, ही भेट भारतात झाली तर आनंदच आहे, असेही झेलेन्स्की यांनी स्पष्ट केले. त्या निमित्ताने भारतीयांशी संपर्क साधता येईल, शांततेसाठी ते महत्त्वाचे आहे असे मत झेलेन्स्की यांनी व्यक्त केली. पहिली जागतिक शांतता शिखर स्वित्झर्लंडमध्ये झाली होती. युक्रेनमध्ये युद्ध थांबवून शांतता प्रस्थापित करणे हाच या परिषदेचा मुख्य हेतू आहे.

## विद्यार्थिनींच्या सुरक्षा उपाययोजनांच्या

यावेळी उपस्थित होते. महिला व बालविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.अनुप यादव, शालेय शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, एससीईआरटी चे संचालक राहूल रेखावार दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.शालेय शिक्षण मंत्री श्री.केसरकर म्हणाले, या समितीने नागरिक, शिक्षण आणि विद्यार्थिनींच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या सूचना असल्यास त्या ऐकून तातडीने अधिक उपाययोजना सुचवाव्यात. सर्व शाळा आयुक्तालयाशी जोडाव्यात. प्रत्येक शाळेला किमान एक इंटरक्टीव्ह टीव्ही देऊन त्या माध्यमातून विद्यार्थिनींना प्रशिक्षण द्यावे. आनंददायी शनिवार उपक्रमामध्ये या प्रशिक्षणाचा समावेश करण्यात यावा. चांगला आणि वाईट स्पर्श ओळखायला शिकवावे. यासाठी माता बालक संघाचीही मदत घ्यावी.

महिला बालविकास मंत्री कु.तटकरे म्हणाल्या, अल्पवयीन विद्यार्थिनींसोबत घडणाऱ्या घटना अतिशय दुर्देवी आहेत. मोठ्या विद्यार्थिनींना दिले जाणारे प्रशिक्षण अल्पवयीन विद्यार्थिनींना समजणे कठीण जाईल, यासाठी निमेटेड फिल्मच्या माध्यमातून त्यांना शिकविण्यात यावे. गुड आणि बॅड टच बाबत अभ्यासक्रमात समावेश करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केली.

## नेपाळ बस दुर्घटनेत जळगावमधील

२४ जणांचा मृत्यू झाल्याची बातमी कळताच मुख्यमंत्री शिंदे यांनी राज्यातील मदत व पुनर्वसन विभागातील अधिकारी, केंद्रीय अधिकारी यांच्याशी संवाद साधत मदतीच्या कामाची माहिती घेतली. मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी संवाद साधून भाविकांचे मृतदेह महाराष्ट्रात तातडीने आणण्याकरिता विनंती केली होती. याप्रकरणी राज्याला सर्वतोपरी मदत करू. त्यासाठी समन्वयासाठी विशेष अधिकारी नियुक्त केल्याचेही केंद्रीय गृहमंत्र्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना सांगितले.

दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या मागणीला तात्काळ प्रतिसाद वायुसेनेचे विशेष विमान मृतदेह आणण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उद्या हे मृतदेह नेपाळवरून उत्तर प्रदेशातील गोरखपुर येथे आणण्यात येतील. तेथून वायुसेनेच्या विमानाने नाशिक येथे ते आणले जातील. त्यानंतर कुटुंबियांकडे मृतदेह सोपविण्यात येणार आहेत.

## इस्त्रोच्या चांद्रयान-३ मोहिमेचा

अंकुश चव्हाण, उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील, सहसंचालक नलिनी टेंभेकर, उपायुक्त तैमूर मुलाणी, आकाशवाणी केंद्राचे प्रसारण अधिकारी सुजित बनसोडे, विज्ञान केंद्राचे राहुल दास एम, नगर राजभाषा कार्यान्वयन समितीचे सदस्य सचिव बिनय प्रसाद साव आणि सहायक प्रचार अधिकारी अंबादास यादव आदी मान्यवर उपस्थित होते.

कुलगुरू महानवर म्हणाले भारतीय शास्त्रज्ञांना चांद्रयान-२ मोहिमेचे सॉफ्ट लँन्डींग करताना अपयश आले तरी शास्त्रज्ञांनी जिद्दीने चांद्रयान-३ मोहीम यशस्वी केली. त्यामुळे रेल्वेची सिग्नल यंत्रणा, टेलिफोनची ५जी पर्यंतची क्रांती तसेच एआय मुळे होणारे संशोधन हे अंतराळ संशोधन यामुळे शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले. आज अंतराळ संशोधन करत असताना पृथ्वीवरील पर्यावरणाचे रक्षण करणे देखील महत्वाचे आहे असेही त्यांनी सांगितले. सहसंचालक टेंभेकर म्हणाल्या, विज्ञान हे मानवाला प्रगतीकडे घेऊन जाणारे एक मोठे साधन आहे. यादृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होणे काळाची गरज आहे. विद्यार्थ्यानी नेहमी सतत संशोधन करत राहावे. चांद्रयान-३ मोहिमेचे यशस्वी प्रक्षेपण आणि अंतराळ संशोधनामध्ये भारतानी केलेली प्रगती विषयी प्रदर्शनात मांडण्यात आलेली माहिती विद्यार्थ्यांना उर्जा आणि नवसंशोधकाना प्रेरणादायी आहे.

अंतराळ क्षेत्रात होत असलेल्या संशोधनामुळे आज मानवी जीवन सुसाह्य झाले आहे. विद्यार्थ्यांनी जीवनात नेहमी संशोधन दृष्टीकोन ठेवावा, असे मत प्रसारण अधिकारी सुजित बनसोडे यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पहिल्या अंतराळ दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

सोलापूर विज्ञान केंद्रात सुरु असलेल्या विविध उपक्रमांची आणि इस्रोच्या स्थापनेपासून ते चांद्रयान-३ मोहिमे पर्यंतच्या प्रवासाची माहिती चित्रफितीच्या माध्यमातून राहुल दास यांनी दिली.

चांद्रयान-३ मोहीम, आपल्या अंतराळ संशोधन प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा, मोठ्या उत्साहात आणि राष्ट्रीय अभिमानाने स्वीकारण्यात आला. विक्रम लँडर आणि रोव्हर प्रज्ञान २३ ऑगस्ट २०२३ रोजी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरले, त्याला 'शिवशक्ती' पॉइंट (सतीओ शिव शक्ती) म्हणून ओळखले जाते, हा आपल्या सर्वासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. चंद्रावर यशस्वी सॉफ्ट लैंडिंग करणारे भारत चौथे राष्ट्र बनल्यानंतर आणि चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश बनला. या घटनेच्या स्मरणार्थ, २३ ऑगस्ट हा दिवस भारतात 'राष्ट्रीय अंतराळ दिन' म्हणून घोषीत करण्यात आला आहे. या वर्षी भारत आपला पहिला राष्ट्रीय अंतराळ दिवस 'चंद्राला स्पर्श करताना जीवनाला स्पर्श करणे: भारताची अंतराळ गाथा' या संकल्पनासह अभिमानाने साजरा केला जात असल्याचे अंकुश चव्हाण यांनी प्रास्ताविकात सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास यादव यांनी केले. उपस्थित विद्यार्थ्यांची प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली.विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमामध्ये २५ शाळेतील विद्यार्थ्यांनी अंतराळ संशोधनावर विविध नाविन्यपूर्ण प्रकल्पाचे सादरीकरण केले. यामध्ये चांद्रयान-३ मोहिमेचे मॉडेल, जलविद्युतनिर्मितीचे प्रकल्प, रॉकेट सायन्स, आर्यभट्ट उपगृह यासारख्या अनेक विषयांवर प्रकल्प सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रदर्शनामध्ये चांद्रयान-३ मोहिमेची निर्मिती, प्रक्षेपण, चंद्रावर उतरलेले विक्रम लँडर आणि रोव्हर प्रज्ञान, अंतराळ तंत्रज्ञान यांचे दुर्मिळ फोटो, मा. पंतप्रधान यांचे भाषण, संपूर्ण मोहिमेचे ऑडीओ व व्हिडीओ आणि सेल्फी विथ चांद्रयान - ३ मोहीम इत्यादी माहिती असणार आहे. हे प्रदर्शन सकाळी ११ ते ५.३० वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यालय सहायक जे एम हन्नुरे, विज्ञान केंद्राचे श्रीकांत बिदरे, ज्योती दास, व्यंकट देशमुख, औदुंबर गायकवाड, बाळासाहेब राठोड, भाग्यश्री मंडवळकर, सोनाली भोसले, राजेंद्र चिटटे, विठ्ठल गायकवाड, अर्चना भोसले, साईराज राऊळ, सुरज जाधव आदींनी परिश्रम घेतले.

## डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी तातडीने

अशी प्रश्नांची सरबत्ती न्यायालयाने केली. अनैसर्गिक मृत्यूचा प्राथमिक तपासणी अहवाल (एफआयआर) नोंदविण्यापूर्वीच, ९ ऑगस्टला संध्याकाळी ६.१० ते ७.१० या वेळेत शवविच्छेदन करण्यात आल्याबद्दलही न्यायालयाने आश्र्चर्य व्यक्त केले.

गुरुवारच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने संपावर असलेल्या डॉक्टरांना पुन्हा कामावर परतण्याचे आवाहन केले. 'न्याय आणि उपचार थांबू शकत नाहीत,' असे न्यायालय म्हणाले. याला सकारात्मक प्रतिसाद देत दिल्लीतील एम्स आणि राममनोहर लोहिया रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनी ११ दिवसांचा संप मागे घेतला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# रिपाई प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवस निमित्त नागणसुर शाखेच्या वतीने शालेय शैक्षणिक साहित्य वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः रिपाई प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या ६७ वा वाढदिवस निमित्त नागणसुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुले - मुली शाळेतील ३०० विद्यार्थ्यांना रीपाई अक्कलकोट तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे यांच्या हस्ते नागणसुर शाखेच्या वतीने शैक्षणिक साहित्य,वह्या आणि केळी ,चॉकलेट खाऊ वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बसलिंगय्या स्थावरमठ होते.प्रमुख अतिथी म्हणून ग्रामपंचायत सदस्य बसवराज मंटगी,प्रसाद प्रचंडे उपस्थित होते .व्यासपीठावर अंबादास गायकवाड,अप्पा भालेराव,प्रकाश गडगडे मुख्याध्यापक विद्याधर गुरव, श्रीशैल दोडमनी ,लक्ष्मीकांत नागोजी,महादेव चीक्कळी, हुच्चप्पा अलामेल आदी उपस्थित होते .

प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले .यावेळी शैक्षणिक साहित्य,वह्या आणि खाऊ वाटप करून रिपाई तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे बोलताना म्हणाले, राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त होणाऱ्या वायपट खर्चाला फाटा देऊन जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊ वाटप करून या वेळी वाढ दिवस साजरा केल्याने नक्कीच गरीब विद्यार्थांना आधार मिळणार आहे .अत्यंत प्रतिकूल परिस्तीथीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीची हात दिल्याने नक्कीच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्र्वास उंचावेल या निस्वार्थ भावनेने हा उपक्रम राबवित असल्याचे प्रतिपादन केले.या वेळी प्रसाद प्रचंडे आणि बसवराज मंटगी यांनी ही उपक्रमाचे कौतुक करून शालेय विकासासाठी नेहमी प्रयत्न शिल राहण्याचे आश्र्वासन दिले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्याधर गुरव, श्रीशैल दोडमनी ,बसय्या स्वामी, शरणप्पा फुलारी,राजशेखर कूर्ले,लक्ष्मीकांत तळवार,खाजप्पा किणगी, शांता तोळणूरे, चन्नम्मा बिराजदार,राजशेखर खानापुरे,शिवशरण म्हेत्रे विजयश्री एंटमन आदींनी परिश्रम घेतले .कार्यक्रमाचे सूत्र संचालन विद्याधर गुरव यांनी केले तर आभार शरणप्पा फुलारी यांनी मानले .

# दीड वर्षांचा बालक सतेज करतो दररोज मॉर्निंग वॉक

## बी.आर.मॉर्निंग ग्रुपने केले कौतुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी : दीड वर्षांचा बालक सतेज दररोज मॉर्निंग वॉक करत असल्यामुळे त्याचे बी आर मोर्निंग ग्रुप ने कौतुक केले आहे. मॉर्निंग वॉक करणे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आणि चांगले आहे . आरोग्याच्या दृष्टीने अशा चांगल्या सवयी लावुन घेणे हे सर्वासाठी चांगले असले तरी सद्याच्या धावपळीच्या जीवनात हे करणे कुणाला शक्य असते तर कुणाला वेळे अभावी शक्य होत नाही परंतु सोलापूर येथील लहान बालक सतेज गायकवाड हा त्यांच्या आजोबां सोबत दररोज मॉर्निंग वॉक करत असतो सतेज दररोज सकाळी ६ वाजता घरातून त्याचे आजोबा सोलापूर येथील वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांच्या सोबत डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे मॉर्निंग वॉक ला निघतो.


> सतेज गायकवाड हा केवळ दीड वर्षांचा बालक असून त्यांच्या आजोबा सोबत मॉर्निंग वॉक ला उद्यानात येतो आम्हीं सकाळी जे मॉर्निंग वॉक करत असतो ते बघूनआपण ही सर्व प्रकार शिकला असून त्याला मॉर्निंग वॉक मध्ये मोठी गोडी लागली आहे त्याचे हे अतिशय लहानपणातील चांगले गुण आताच्या पिढीला घेण्यासारखे आणि आदर्शवत आहेत.
>
> **केरु जाधव, सेवा निवृत्त पोलिस अधिकारी सोलापूर शहर**



उद्यानातील प्रशस्त आणि स्वच्छ हवेच्या व मोकळ्या मैदानात तो वेगवेगळ्या प्रकारच्या कसरती करतो. गवतावर उड्या मारणे, गवतावर , झोपणे, पळणे असे प्रकार तो करत असतो दररोज सकाळी तो मॉर्निंग वॉक ला घेवुन जाण्यासाठी त्याच्या आजोबा कडे हट्ट धरतो. मॉर्निंग वॉक वरून परत घरी आल्यावरच तो काही तरी खातो. पण सकाळीं ६ ते ९ वाजेपर्यंत तीन तास मॉर्निंग वॉक मध्येच घालवतो, सतेज दररोज डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानात मॉर्निंग वॉक ला जावून फेर फटका मारत मॉर्निंग वॉक करत असल्यामुळे सकाळीं फिरायला येणाऱ्या सर्वांचा तो लाडका झाला आहे.

डॉ बी आर मॉर्निंग ग्रुप चे संस्थापक आणि सेवा निवृत्त पोलिस अधिकारी केरु जाधव साहेब, माजी नगरसेवक अशोक जानराव साहेब , सेवा निवृत्त शिक्षक रतन कांबळे सर तसेच श्याम शिंगे सर आणि सुमेध डोलारे, मेजर भारत आवारे., अनिल जगझाप, शाहु दावणे, यांच्या सह डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान महीला मॉर्निंग ग्रुप आणि महिला बचत समूहाच्या मालिनी दोड्यानुर, कल्पना सुरवसे, मीनाक्षी बनसोडे, मुन्ना ताई बनसोडे आदींनी सतेज चे दररोज कौतुक करून त्याला मॉर्निंग वॉक मध्ये वेगवेगळ्या चांगल्या सवयी लावत आहेत.

# दर्शनाळ तंटामुक्त समिती अध्यक्षपदी मल्लिनाथ माकणे यांची बिनविरोध निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

दर्शनाळ/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील दर्शनाळ येथील तंटामुक्त समिती अध्यक्षपदी मल्लिनाथ माकणे यांची बिनविरोध निवड बुधवार दिनांक २२ ऑगस्ट २०२४ रोजी मौजे दर्शनाळ येथे ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये तंटामुक्त अध्यक्ष म्हणून श्री मल्लिनाथ काशिनाथ माकणे यांची बिनविरोध अध्यक्ष पदी निवड करण्यात आले. या बैठकीचे अध्यक्ष म्हणून दर्शनाळ गावचे सरपंच सुनील बिराजदार उपसरपंच गुलशन नाशिर चौधरी ग्रामपंचायत सदस्य आजी माजी व अंगणवाडी पर्यवेक्षक अश्र्विनी चटमुटगे माजी तंटामुक्त अध्यक्ष हाजीम शेख, माजी ग्रामपंचायत उपसरपंच मजू चौधरी, सुरेश तानवडे, शिवाजी गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर सराटे, सिद्धाराम तानवडे, विकास सोसायटी संचालक काशिनाथ माकणे, माजी उपसरपंच महिबुब चौधरी, हमदू भेलमे,कोडाजी चौधरी, आकाश माने, इतर मान्यवर उपस्थित होते. एक मताने निवड झाल्यानंतर अध्यक्ष यांना पुष्पहार शाल व फेटा भरून यथोचित सत्कार करण्यात आला शेवटी मल्लिनाथ माकणे यांनी सर्व ग्रामस्थांचे निवड केल्या प्रकरणी आभार मानले.

# मानवतेला काळीमा फासणाऱ्या प्रकरणाच्या निषेधार्थ आंदोलन करणाऱ्या बदलापुरवासियांवरील गुन्हे रद्द करावेत

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवलेंची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

मुंबई : बदलापूर मधील अत्यंत लहानग्या मुलींवरील अत्याचाराची घटना महाराष्ट्राला मान खाली घालायला लावणारी आहे.मानवतेला काळीमा फासणाऱ्या या घटनेच्या निषेधार्थ उत्स्फूर्त आंदोलन करणाऱ्या बदलापूरवासियांवर दाखल झालेले गुन्हे रद्द करावेत.बदलापूर मधील त्या आंदोलकांना अटक करू नये अशी आपली मागणी असून त्यासाठी आपण लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहोत अशी माहिती रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी दिली.

बदलापूर प्रकरणातील पीडित लहानग्या मुलींच्या कुटुंबाला मुख्यमंत्र्यांनी विशेष सहाय्य म्हणून आर्थिक मदत दिली पाहिजे अशी मुख्यमंत्र्यांकडे आपण मागणी करणार आहोत असे ना.रामदास आठवले म्हणाले.



आज बदलापूर ला भेट देऊन येथील नगरपरिषद कार्यालयात बदलापूर प्रकरणाबाबत सर्व पोलीस आणि प्रशासन अधिकाऱ्यांची बैठक ना.रामदास आठवले यांनी घेतली.यावेळी पोलीस उपायुक्त डॉ सुधाकर पठारे; तहसीलदार अमित पुरी; बदलापूर नगर परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी मारुती गायकवाड आदी अधिकारी पोलीस प्रशासन अधिकारी उपस्थित होते. बदलापूर मधील आदर्श विद्यालयात ही दुर्घटना घडली त्या शाळेचे व्यवस्थापन बरखास्त करण्यात आले असून प्रशासक नियुक्त करण्यात आला आहे.याप्रकरणी आयपीएस अधिकारी आरती सिंग यांच्या नेतृत्वात एस आय टी ची स्थापना करण्यात आली आहे.या प्रकरणातील आरोपी ला फाशीची शिक्षा झाली पाहिजे यासाठी खटला जलद गती न्यायालयात चालविण्यात येणार असून विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.या प्रकरणाची मुख्यमंत्र्यांनी राज्य सरकार ने गांभीर्याने दखल घेतली आहे.आरोपीला फाशी शी कठोर शिक्षा होण्यासाठी विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांची नियुक्ती केली आहे.

विरोधी पक्षाने या प्रकरणी राजकारण करू नये.हे अत्यंत निषेधार्ह मानवतेला काळीमा फासणारे प्रकरण आहे .उज्वल निकम हे अनुभवी वकील असल्यानेच त्यांना विशेष सरकारी वकील म्हणून या प्रकरणी नियुक्ती केली असल्याची माहिती ना.रामदास आठवले यांनी दिली.आरोपी शिंदे हा मूळ गुलबर्गा कर्नाटक चा रहिवासी असून १ ऑगस्ट पडून तो कामावर आला होता.लहान मुलींच्या सांभाळा साठी महिला सेवकच शाळेत नियुक्त केले पाहिजेत त्यासाठी पुरुष मदतनीस ठेवणे अत्यंत चुकीचे आहे असे ना. रामदास आठवले म्हणाले.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे सुरेश बार्शींग; अण्णा रोकडे; दयाळ बहादुर; बाळाराम गायकवाड; सिद्राम ओव्हाळ;भास्कर वाघमारे ; भगवान भालेराव; संजय गायकवाड; प्रल्हाद जाधव; रामा कांबळे; संजय गायकवाड; बाळ भालेराव; बबन केदारे; प्रल्हाद मगरे आदी अनेक रिपाइं पदाधिकारी उपस्थित होते.

# बदलापूरच्या नराधमाला तात्काळ फाशी द्या : सातलिंग स्वामी

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

उमरगा/प्रतिनिधी : बदलापूर येथील शाळेतील लहान मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणी उमरगा लोहारा विधानसभा क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते तथा शिवा संघटनेचे पदाधिकारी सातलिंग स्वामींनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना दि २२ रोजी निवेदन देत तात्काळ फाशी देण्याची मागणी करत उमरगा लोहारा विधानसभा क्षेत्रातील सर्व खाजगी, जि प शाळा आणि संस्थेच्या शाळातील कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी,शाळेला मुलींना घेऊन जाणाऱ्या वाहनचालकांची पार्श्वभूमी तथा वाहनाचे पेपर आणि शाळेत मुलींसाठी स्वतंत्र, सुरक्षित स्वच्छतागृह आहेत का? याची तपासणी करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की,आपल्या महाराष्ट्र राज्यातील बदलापूर येथील अवघ्या साडे तीन वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला (गुन्हेगाराला)जलदगती न्यायालयात सदर केस चालवून तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी यासाठी आपण महाराष्ट्र शासन विशेष पुढाकार घ्यावा जेणेकरून भविष्यात असे कृत्य कोणीही करणार नाही, आपल्या या निर्णयाचे देशातील सर्व नागरिक प्रतीक्षा करत आहेत.लोकांच्या/पालकांच्या खुप अपेक्षा आपल्याकडून आहेत तसेच माझ्या उमरगा लोहारा विधानसभा मतदार संघातील सर्व खाजगी आणि जि प शाळा व संस्थेच्या शाळांची विशेष तपासनी करून शाळेतील कर्मचाऱ्यांची पार्शभूमी तपासन्यात यावी ज्यांची गुन्हेगारी पार्शभूमी आहे अशयाना काढून टाकण्यात यावे.

तसेच शाळेला शालेय मुलींना घेऊन जाणाऱ्या शाळेच्या व खाजगी वाहणाच्या पेपर आणि वाहन चालक व्यसनाधीन तथा गुन्हेगारी पार्शभूमीवर वाहन चालक परवाने रद्द करण्यात यावे तसेच सर्व शाळेत मुलींसाठी स्वतंत्र व सुरक्षित स्वछतागृह आहेत का..? नसतील तर तात्काळ बांधून घेण्याबाबत आदेश करावें अन्यथा त्या संबंधित शाळेवर कारवाई व्हावी अशी विनंती या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



# कोठुरे स्वा.सावरकर विद्यालयाचे दुहेरी यश..

निफाड/प्रतिनिधी :नासिक जिल्हा परिषद अंतर्गत झालेल्या स्विमिंग प्रकारातील स्पर्धेत स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालयाची इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कु. आदिती रमेश मोगल हिने ब्रेस्ट्रोक प्रकारात व आदित्य शरद चौबे याने फ्रीस्टाइल स्विमिंग या प्रकारात प्रथम क्रं. मिळवून विभाग स्तरावर निवड झाली .त्याबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, शालेय समिती सदस्य,विद्यालयाचे मुख्याध्यापक सानप एस. डी .शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी तिचे अभिनंदन केले,विद्यार्थ्यांना विद्यालयातील क्रीडा शिक्षक संजय गायके यांचे मार्गदर्शन लाभले.

# स्वेरीने सामाजिक बांधिलकी जपत साजरा केले अनोखे रक्षाबंधन!

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः रक्षाबंधन !! तसा भाऊ बहिणीच्या अनोख्या नात्याचा दिवस !! हा सण सर्वत्र विविधतेने व उत्साहात साजरा केला जात असल्याचे पाहतो. या पवित्र सणाच्या निमित्ताने अनेक भाऊ हे बहिणीसाठी महागड्या वस्तू,साडी,भेटवस्तू इ. ओवाळणी म्हणून देत असतात परंतु एक समाजोपयोगी उपक्रम साजरा करून स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी याहून जरा वेगळे कार्य केले आहे,याचीच पंढरपूर पंचक्रोशीत चर्चा होतेय...!






याचं असं झालं की सोमवारी रक्षाबंधनाच्या निमित्ताने स्वेरी अभियांत्रिकीचे साधारण १०० विद्यार्थी एकत्र जमले,आपसात चर्चा केली आणि कोर्टी रोडलगत असलेल्या'प्रभा-हिरा प्रतिष्ठान'संचलित विशेष बालकांचे संगोपन केंद्र असलेल्या'पालवी'कडे मार्गस्थ झाले. पालवीच्या आवारात चिमुकली मुले खेळत-बागडत होती. अचानक आलेल्या स्वेरीच्या विद्यार्थ्यांना पाहून मुले कावरी-बावरी झाली. काही समजण्याच्या आत स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी'पालवी'च्या प्रमुख श्रीमती मंगलताई शहा यांच्याशी चर्चा करून'पालवी'तील सभागृहातच कार्यक्रम घेण्याचे ठरवले. सुरुवातीला प्रवीण येडगे या विद्यार्थ्याने पुढे येऊन प्रास्ताविकात रक्षाबंधन पालवीमध्ये का साजरा करायचा?यामागचा हेतू स्पष्ट केला. या निमित्ताने स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील'मेसा' (मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्टुडन्टस असोसिएशन) चे विद्यार्थी अध्यक्ष देवेश खरे यांनी पालवीमध्ये येण्याचे प्रयोजन सांगितले. यानंतर चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उत्साह वाढत होता'पालवी'च्या सचिवा डिंपल घाडगे यांनी आपल्या मनोगतात स्वेरीच्या आजच्या प्रयोजनाबाबत चिमुकल्यांना कल्पना दिल्यानंतर पालवीचा वचननामा सादर केला. ज्यामध्ये पालवी मधील विद्यार्थ्यांची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या ऐकून स्वेरीचे प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या अंगावर शहारे उमटले. यानंतर पालवीच्या चिमुकल्यांनी स्वेरीच्या विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या. यावेळी त्यांना खाऊ वाटप करण्यात आले. याप्रसंगी स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी

पालवीत चिमुकल्या हातांनी बनवलेल्या वस्तू,आकर्षक राख्या घेतल्या. त्याचबरोबर चिमुकल्यांना भेट म्हणून मोठी गॅस शेगडी,कॉम्प्युटर साहित्य,पेपर,मुलांना पौष्टिक असे शेंगदाण्याचे लाडू आणि केळी यांसह जवळपास पाच हजार रुपयांच्या वस्तूंची मदत पालवीतील विद्यार्थ्यांना केली. वायफळ खर्च न करता स्वेरीतील विद्यार्थ्यांनी पैशाचा सदुपयोग व्हावा या हेतूने पालवीतील चिमुकल्यांकडे मदत सोपवली. संपूर्ण दिवस विद्यार्थ्यांनी पालवीतील चिमुकल्यांबरोबर घालविला. यावेळी तेथील बालकांनी आपले कलागुणही सादर केले. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शना खाली,कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार यांच्या सहकार्याने मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.श्रीकृष्ण भोसले व 'मेसा'चे समन्वयक प्रा.संजय मोरे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून प्रणव पाटील,दिग्विजय बुरा,प्रियंका सोनवणे,गायत्री गायकवाड,रविराज नाईकनवरे यांच्यासह जवळपास शंभर विद्यार्थी- विद्यार्थिनी या उपक्रमाला उपस्थित होते. सदरचा उपक्रम स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या'मेसा'मार्फत घेण्यात आला. यावेळी क्षितिजा उराडे यांनी सूत्रसंचालन केले तर विद्यार्थी प्रतिनिधी देवेश खरे यांनी आभार मानले.

# आ.समाधान आवताडे यांच्या प्रयत्नांना यश

## पंढरपूर एमआयडीसी मंजूर लवकरच होणार भूमिपूजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर शहर हे तीर्थ म्हणून प्रसिद्ध म्हणून ओळखले जाते ही पंढरपूर शहर व तालुका चार वाऱ्यांच्या वर चरितार्थ चालवणारे हे शहर व तालुका म्हणून ओळखले जाते

या पंढरपूरसाठी एमआयडीसीची गरज असल्याचे मागणी गेले कित्येक वर्षापासून येतील नागरिकांची व युवकांची आहे परंतु राजकीय उदासीनतेमुळे गेले ४० ते ५० वर्षांमध्ये या ठिकाणी एमआयडीसी ही निर्माण होऊ शकलेली नाही व पंढरपूर सारख्या शहराच्या आजूबाजूच्या इंजिनिअरिंग कॉलेज भरपूर असून त्याचप्रमाणे आयटीआय सारखे कोर्सेस असलेले विद्यालय आहेत महाविद्यालयांमधून बाहेर पडणारे असंख्य कुशल अर्धकुशल असे विद्यार्थी रोजगारासाठी नोकरीसाठी पुणे मुंबईच्या दिशेने जात आहेत अशा तरुण शिक्षित विद्यार्थ्यांना त्यांच्या हाताला काम मिळवण्यासाठी या उद्देशाने पंढरपूर सारख्या ठिकाणी एमआयडीसीची गरज असल्याची जाणवल्यामुळे एमआयडीसीची मागणी ही मी आमदार या नात्याने महाराष्ट्र राज्य सरकारकडे सतत पाठपुरावा दोन वर्षे पाठपुरावा करून पंढरपूर सारख्या ठिकाणी एमआयडीसीची मंजुरी ही मिळवून आणलेले आहे त्यासाठी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री तसेच उद्योग मंत्री उदय सावंत यांनी या पंढरपूर तालुक्यातील कासेगाव या ठिकाणच्या एमआयडीसीला मंजुरी दिलेली आहे लवकर या एमआयडीसीचे भूमिपूजन होणार असून या ठिकाणी महाराष्ट्रातील मोठे उद्योजक हे आपले कारखाने उद्योगधंदे सुरू करणार आहे आबांनी अंबानी आदाने तसेच टाटा या मोठ्या उद्योगपतींना पंढरपूर सारख्या ठिकाणी आपले उद्योगधंदे सुरू करावे असे विनंती करण्यात आलेली आहे त्यांनी सकारात्मक अशी भूमिका घेतलेली आहे पंढरपूर सारख्या ठिकाणी मोठे उद्योगधंदेही सुरू होतील आणि येथील बेरोजगार तरुणांना त्यांच्या हाताला रोजगार भेटेल तसेच पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील शेतकरी



यांच्या पिकावर विविध प्रक्रिया करणारे उद्योगधंदेही देखील या ठिकाणी सुरू होणार असून या माध्यमातून तरुण बेरोजगारांच्या हाताला काम मिळणार आहे व शेतकऱ्यांना आपल्या जोडधंदा देखील सुरू करता येणार आहे अशी माहिती आज पंढरपूर येथील पत्रकार परिषदेमध्ये पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार समाधान दादा अवताडे यांनी माहिती दिली गेली दोन वर्षे सातत्याने पंढरपूर येथील एमआयडीसी तसेच मंगळवेढा येथे पाणीटंचाईग्रस्त असलेली २४ गावे या गावांची पिण्याचे पाण्याची योग्य सोय होणार आहे याची मंजुरी आणलेली आहे तसेच पंढरपूर येथील काशिगाव या भागातील एकूण साडेतीनशे एकरावर ही एमआयडीसी निर्माण होणार असून या ठिकाणी निर्माण होत असलेल्या एमआयडीसीसाठी आवश्यक असलेले पाणीपुरवठा रेल्वे वाहतूक तसेच मोठे महामार्ग हे जवळ असल्यामुळे या ठिकाणी होणाऱ्या एमआयडीसीला महत्त्व आलेले आहे या जागेची पाहणी महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी भेट दिलेली आहे आणि या जागेला त्यांनी मंजुरी तसेच पसंती देखील दर्शवलेली आहे अशी माहिती आज आमदार समाधान दादा अवताडे यांनी पत्रकारांना दिली

महाराष्ट्रातील मोठ मोठ्या उद्योजकांना या पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथे होणाऱ्या एमआयडीसीमध्ये उद्योगधंदे सुरू करण्यासाठी आमंत्रित केलेली आहे

पंढरपूर शहरासाठी एमआयडीसी होईल का नाही? अशी शंका विरोधक करत असताना त्या विरोधकांच्या बोलण्याकडे मी सातत्याने दुर्लक्ष करून मी निवडणुकीच्या वेळेला सर्वसामान्य जनतेला दिलेला आश्र्वासन त्यामधील प्रमुख आश्र्वासन म्हणजे पंढरपूर शहरासाठी एमआयडीसी आणि मंगळवेढा तालुक्यातील २४ गावांच्या साठी पाणी पुरवठा योजना ही मंजूर करणे असे दिलेले आश्र्वासन मी पुनर्वास नेले आहे एमआयडीसी व मंगळवेढा तालुक्यातील पाणी प्रश्र्न हा मी गेले दोन वर्षापासून सातत्याने केलेले पाठपुरावामुळे सोडू शकतो मग मी माझ्या भाषणांमधून कमी बोलतो परंतु मी जे बोलतो ते करून दाखवतो ही माझी कामाची पद्धत असून मी बोलण्याप्रमाणे एमआयडीसी ची ही मंजुरी करून आणलेली आहे त्याचे समाधान मला लाभले आहे पंढरपूर शहर व तालुक्यातील बेरोजगार तरुणांसाठी एमआयडीसी सारख्या प्रकल्प मी आणू शकतो व मी तरुण बेलवर बेरोजगारांना तरुणांना मी एमआयडीसीचा दिलेला शब्द मी पूर्ण केलेला आहे असे देखील पंढरपूरला पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान दादा अवताडे यांनी आज पत्रकार परिषदेमध्ये सांगितली

यावेळी भाजपची असंख्य कार्यकर्ते व स्थानिक नेते मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सोलापूरला गतवैभव मिळवुन देण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचे काम कौतुकास्पद; सोलापूर विकास मंच

## सोलापूर जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्याकडे सोलापूर विकास मंचने सादर केले निवेदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्याकडे सोलापूर विकास मंचच्या वतीने विविध मागण्या सादर करण्यात आल्या. सोलापूरकरांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर लक्ष घालावे, अशी मागणी पत्राद्वारे करण्यात आली.

१. पंढरपूर तथा जिल्हा एकात्मिक पर्यटन आराखडा विकासासाठी मंजूर निधीबाबत आभार व्यक्त:

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर शहराच्या आध्यात्मिक आणि धार्मिक पर्यटन विकासासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने ११० कोटी रुपये मंजूर केले आहेत. यासोबतच, जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यासाठी २८२ कोटी रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला आहे. या महत्वपूर्ण निर्णयाबद्दल जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचे सर्व सोलापूरकरांच्या वतीने आभार मानण्यात आले.

२. छत्रपती संभाजी महाराज चौक ते सीएनएस हॉस्पिटल ते राजस्व नगर रस्त्याच्या कामासाठी निधी मंजुरीची मागणी: सोलापूरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते सीएनएस हॉस्पिटल ते राजस्व नगर दरम्यान ५४ मीटर रुंदीच्या रस्त्याचे काम हाती घेण्यासाठी उझऊ किंवा केंद्र तथा राज्य शासनाच्या विविध योजनांमधून निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या रस्त्याच्या विकासाने शहरातील वाहतूक समस्यांचा मोठा प्रश्र्न सुटणार आहे.

३. डॉल्बी आणि लेझर वापराबाबत नियमांचे पालन करण्याचे निर्देश: शहरातील सण, उत्सव आणि मिरवणुकांमध्ये डॉल्बी आणि लेझरचा वापर केला जातो. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विविध नियमांचे तंतोतंत पालन करण्यात यावे, असे निर्देश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर पोलीस आयुक्तालय, आणि सोलापूर महानगरपालिकेस देण्यात यावेत, अशी मागणी पत्रात करण्यात आली आहे.

४. सोलापूरातील उड्डाण पूल प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करणे: छक-ख तर्फे सोलापूर शहरातील दोन उड्डाण पूल प्रकल्पांसाठी निविदा प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. परंतु, भूसंपादनाच्या संथ गतीमुळे हे प्रकल्प रखडले असून त्याचा परिणाम प्रकल्पाच्या खर्चावर झाला आहे. यामुळे करदात्यांवर अतिरिक्त भार पडला आहे. भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून काम सुरू करण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली आहे.

५. होटगी रोड विमानतळावर नागरी विमानसेवा सुरू करण्यासाठी ऊक्षउ–कडून तातडीने पावले उचलणे:

होटगी रोड विमानतळावरील सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. त्यामुळे नागरी विमानसेवा सुरू करण्यासाठी DGCA कडून तातडीने पावले उचलण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

६. जिल्ह्यातील प्रमुख मंदिर परिसर भिक्षेकरी मुक्त करणे आणि पुनर्वसनाचे उपाय: सोलापूर शहरातील श्री सिद्धरामेश्र्वर मंदिर, पंढरपूरातील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, तसेच जिल्ह्यातील प्रमुख मंदिर परिसरात भिक्षेकरींची संख्या वाढत आहे. ही बाब पर्यटनासाठी हानिकारक ठरू शकते. त्यामुळे मंदिर परिसर भिक्षेकरी मुक्त करून त्यांच्या पुनर्वसनाची व्यवस्था करण्यात यावी. तसेच, मंदिर परिसरात अन्नदान करण्यास मनाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

७. झोपडपट्टी मुक्त सोलापूरसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजना:सोलापूर शहरात जवळपास २८% नागरिक झोपडपट्ट्यांमध्ये अतिशय दयनीय परिस्थितीत जीवन व्यतीत करत आहेत. या नागरिकांचे जीवनमान उंचवण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेंतर्गत विविध प्रकल्प हाती घेण्यात यावेत. यामुळे सोलापूर शहर झोपडपट्टी मुक्त होऊन नागरिकांचे जीवन सुखकर होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून या सर्व मागण्यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी सोलापूर विकास मंचच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्याकडे विनंती केली. ह्या वेळी सोलापूर विकास मंचचे विजय कुंदन जाधव, ॲड. प्रमोद शहा, आनंद पाटील, बाळासाहेब मोरे, घनश्याम दायमा, भारत पाटील, तुकाराम चाबुकस्वार, श्रध्दा पाटील, चंद्रकांत इश्र्वरकट्टी आदी मान्यवर सदस्य उपस्थित होते.

# डॉ.आंबेडकरांची शैक्षणिक क्षेत्रातील दूरदृष्टी आजच्या तरुणांनी अभ्यासली पाहिजे : डॉ.सायबण्णा घोडके




**मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात आयोजित व्याख्यानाप्रसंगी डॉ. सायबण्णा घोडके बोलताना प्राचार्य अशोक सपाटे, डॉ. प्रतापसिंग राजपूत, डॉ. शिला स्वामी, प्रा. अशोक बावगे**

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

उमरगा/प्रतिनिधीः मिलिंद महाविद्यालयाच्या इमारतीतून सुरु झालेले विद्यापीठाचे कामकाज, भौतिक सेवा सुविधा, उच्च शिक्षणातील प्रगती, स्वतंत्र उपकेंद्राची स्थापना, विविध शाखांचा विस्तार आणि विद्यापीठाचा वाढता आलेख पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास जे नाव देण्यात आले त्याचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान वाटतो. त्यानंतरच्या काळातील मिलिंद महाविद्यालयातील नवशिक्षित तरुणांनी सुरु केलेला १९७६ मध्ये तीव्र झालेला नामांतराचा लढा ते १९९४ चे नामविस्तार आणि आतापर्यंतच्या विद्यापीठाची वाटचाल या सर्व ऐतिहासिक घडामोडींचा आढावा त्यांनी मांडला. डॉ. आंबेडकरांची शैक्षणिक क्षेत्रातील दूरदृष्टी आजच्या तरुणांनी अभ्यासली पाहिजे असे प्रतिपादन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सायबण्णा घोडके यांनी केले. मुरुम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६६ वा वर्धापन दिन शुक्रवारी (ता. २३) रोजी व्याख्याते म्हणून ते बोलत होते. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस व कै. माधवराव पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यापीठ ध्वज फडकावून विद्यापीठ गीत गाऊन, विद्यापीठ वर्धापन दिन चिरायू होवो ! अशा घोषणा देवून वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अशोक सपाटे होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रतापसिंग राजपूत, डॉ. शिला स्वामी, प्रा. अशोक बावगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक बावगे तर आभार प्रा. डॉ. शिला स्वामी यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# डुबेरे जनता विद्यालयात समाजदिन व विद्यार्थी गुणगौरव समारंभ उत्साहात संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सिन्नर/प्रतिनिधीः डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठा विद्या प्रसारक संस्थेचे संस्थापक कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्मदिवस समाजदिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष व उच्च माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष विठ्ठलतात्या वामने यांच्या हस्ते संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. कर्मवीर रावसाहेब थोरात, कर्मवीर काकासाहेब वाघ, कर्मवीर अण्णासाहेब मुरकुटे,कर्मवीर भाऊसाहेब हिरे, कर्मवीर बाबुराव ठाकरे,कर्मवीर वसंतराव पवार, कर्मवीर विठ्ठलराव हांडे, छत्रपती शिवाजी महाराज आदींच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. गीतमंचाने समाजगीत सादर केले. व्यासपीठावर शालेय समितीचे सदस्य भाऊ वारुंगसे, विजय दादा वाजे, काशिनाथ वाजे,देणगीदार भगवान वाजे,कारभारी वारुंगसे,दामोदर वाजे,शंकरराव वामने,माजी सरपंच शरद माळी, अशोकराव गवळी, अण्णासाहेब वारुंगसे, माजी सरपंच अर्चना ढोली, ॲड प्रदीप वारुंगसे,गणेश वाजे,पत्रकार सुनिल जाधव आदी उपस्थित होते.कर्मवीरांच्या जीवन व कार्याचा परिचय गौरी वाजे ,आरोही जाधव ,अंकिता ढोली,मानसी जाधव या विद्यार्थ्यासह उपशिक्षक सोमनाथ गिरी,फुले ज्युनियर कॉलेजचे उपप्राचार्य एकनाथ माळी यांनी करून दिला. विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी प्रास्ताविकात संस्थेचा व कर्मवीरांचा परिचय करून उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी स्वागतगीत सादर करण्यात आले.

एस.एस.सी व एच.एच.सी परीक्षेत पहिल्या १ ते ५ क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांसह विविध स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा ग्रामस्थांनी दिलेल्या देणगीतून मान्यवरांच्या हस्ते रोख बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला.तसेच गरीब, होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले.बक्षिसांचे नियोजन व यादी वाचन सोमनाथ पगार,भारती निखाडे,टी. के बहिरम यांनी केले. यावेळी बोलतांना महात्मा फुले ज्युनियर कॉलेजचे उपप्राचार्य एकनाथ माळी म्हणाले की ,कर्मवीरांनी स्वतः च्या प्रपंचाचा विचार न करता समाजाच्या प्रपंचाचा विचार करत आपले आयुष्य शैक्षणिक कार्यासाठी वेचले. विद्यार्थ्यांसह इतरांनी कर्मवीरांच्या कार्याचा आदर्श घ्यावा असे आव्हान माळी यांनी केले. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात जिद्द चिकाटी ठेवल्यास यश निश्र्िचत मिळते. असेही ते म्हणाले.

समाजदिनानिमित्त रांगोळी काढणे,पुष्परचना,कबडडी, खो-खो,रस्सीखेच,स्लो सायकल, चमचा-लिंबू शर्यत, बादलीत चेंडू टाकणे, वाटीत नाणे टाकणे ,गाढवाला शेपूट लावणे आदी स्पर्धा घेण्यात आल्या. सलग दोन दिवस संपन्न झालेल्या स्पर्धेचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला.रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.सूत्रसंचालन सुषमा थोरात व सोमनाथ गिरी यांनी आभार प्राध्यापिका वृषाली घुमरे यांनी मानले. यावेळी सदाशिव वारुंगसे,मीनाक्षी वाजे,सचिन माळी, कैलास माळी, वरिष्ठ लिपिक राणी शिंदे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ ,संस्थेचे सभासद ,हितचिंतक व देणगीदार उपस्थित होते.

# एम.आय.टी.च्या मंदार दुधाळे आय आय.टी.साठी निवड

पंढरपूर/प्रतिनिधी : एम.आय.टी. जुनिअर कॉलेज वाखरी पंढरपूर येथील विद्यार्थी मंदार दुधाळे यांनी जेईई डव्हान्स ट क्रॅक करून ९२.९% मिळवलेले पुढील शिक्षणासाठी त्यांची इंजिनिअरिंग साठी आयआयटी गांधीनगर गुजराती येथे इलेक्ट्रिकल शाखेत निवड झाली आहे. पंढरपूर येथील एमआयटी ज्युनिअर कॉलेज मधील गणित विषयाचे प्राध्यापक अविनाश सर. स्वप्ना मॅडम परदेशी सर. मिस्टेस सौ शिवानी बॅनर्जी मॅडम. प्राचार्य डॉक्टर स्वप्निल शेठ यांचे त्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले

मंदार दुधाळे यांनी शिक्षण घेत असताना विविध परीक्षांच्या माध्यमातून अनेक प्रमाणपत्र मिळवलेले आहेत त्याला मिळालेल्या या प्रवेशाबद्दल पंढरपूर येथील अनेक मान्यवर मंडळी शुभेच्छा दिल्या आहेत.

